वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

विद्यापीठाने निर्मिती केलेले सुधारीत व संकरीत वाणाबद्दल सर्व समावेशक व सविस्तर माहिती

अ.क्र.	तपशील		सविस्तर माहिती
१	पीक/वाणाचे नाव		**जवस : आर. एल. सी. – ४ (जगदंबा)**
२	प्रसारीत केल्याचे वर्ष		१९९५
३	प्रसारीत करणारी संस्था/विद्यापीठ		वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
४	जमीन		मध्यम ते भारी, ओलावा टिकवून ठेवणारी, पाण्याचा उत्तम निचरा असणारी जमीन योग्य. सामू ६.५ ते ८.० असावा.
५	हवामान		मुख्यत्वे रब्बी हंगामातील पीक, वाढीसाठी २० ते ३० अंश से. तापमान आवश्यक असते. फुलोरा व त्यानंतरच्या अवस्थेत जास्त कोरडे व उच्च तापमान (> ३२°से.) नसावे.
६	पेरणी/लागवडीचा कालावधी		**कोरडवाहू** - आक्टोबरचा पहिला आठवडा **बागायती** - ऑक्टोबरचा तिसरा व शेवटचा आठवडा
७	प्रती एकरी बियाणे		१० किलो प्रती एकरी
८	पीक व्यवस्थापन		
	१	लागवडीचे/पेरणीचे व्यवस्थापन	**बीजप्रक्रिया** – पेरणीपूर्वी प्रती किलो बियाण्यास कार्बेन्डॅझिम २ ग्रॅम किंवा थायरम ३ ग्रॅम बुरशीनाशक पेरणीपूर्वी बियाण्यास चोळावे. त्यानंतर प्रती १० किलो बियाण्यास २५० ग्रॅम ॲझोटोबॅक्टर व २५० ग्रॅम स्फूरद विरघळणा-या जीवाणूची बीजप्रक्रिया करावी. **लागवड-** पेरणीकरीता दोन ओळीतील अंतर ३० सेंमी ठेवावे व दोन रोपातील अंतर १० सेंमी ठेवावे. पेरणी करताना बियाणे २-३ सेंमी पेक्षा जास्त खोलीवर पेरु नये. **आंतरमशागत** – जवस पीक ३० दिवसापर्यंत तणविरहित ठेवावे. याकरीता १ ते २ कोळपणी व खुरपणी करावी.
	२	खत व्यवस्थापन	**कोरडवाहू :** ४०:२०:०० नत्र, स्फुरद आणि पालाश किलो/हे + २५ किलो गंधक (पूर्ण नत्र, स्फुरद आणि पालाश पेरणीच्या वेळी) **बागायती :** ६०:३०:०० नत्र, स्फुरद आणि पालाश किलो/हे + २५ किलो गंधक (५० टक्के नत्र आणि पूर्ण स्फुरद आणि पालाश पेरणीच्यावेळी व उर्वरित ५० टक्के नत्र पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी)
	३	पाणी व्यवस्थापन	१. पहिले रोप अवस्था : २५ ते ३० दिवस २. दुसरे फुलोरा अवस्था : ५० ते ५५ दिवस ३. तिसरे बी भरणे अवस्था : ७० ते ७५ दिवस
	४	कीड व्यवस्थापन	गादमाशी (बड फ्लाय) ही जवस पिकावरील प्रमुख कीड असून या किडीच्या नियंत्रणासाठी डायमिथोएट ३० टक्के प्रवाही १०

			मि.ली. १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. जवसाची पेरणी वेळेवर केल्यास गादमाशी पासून नुकसान कमी होते.
	५	**रोग व्यवस्थापन**	अल्टरनेरीया, पानावरील ठिपके व तांबेरा या रोगांच्या नियंत्रणासाठी मँकोझेब (डायथेन एम-४५) हे बुरशीनाशक २५ ग्रॅम प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. भुरी रोगाचे नियंत्रणासाठी पाण्यात मिसळणारी गंधकाची भुकटी २५ ग्रॅम प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. मर रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच मर रोग प्रतीबंधक वाणांचा वापर करावा.
९	**पिकाचा कालावधी**		११० ते ११५ दिवस
१०	**उत्पादकता**		**कोरडवाहू :** ०७ ते ०८ क्विंटल/हेक्टर **बागायती :** ०८ ते १० क्विंटल/हेक्टर
११	**वाणाची वैशिष्ट्ये/विशेष गुणधर्म**		१. भुरी व तांबेरा रोगास सहनशील. २. गादमाशी कीडीस सहनशील ३. फुलाचा रंग – जांभळा ४. तेलाचे प्रमाण : ३६ ते ३७ टक्के
१२	**वाणासंबंधीचे छायाचित्रे**		